महाराष्ट्र शासन

तात्काळ

नगर विकास विभाग

मुख्य इमारत, ४था मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

Email ID :- pandurang.jadhav@nic.in

क्रमांक :- संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१३७/नवि-३३ दिनांक :- ०९ जुलै, २०२०

प्रति,

१. आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
वरळी, मुंबई.

२. आयुक्त, सर्व महानगरपालिका.

३. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद.

४. मुख्याधिकारी, सर्व नगरपंचायत.

**विषय :-केंद्र शासनाचे गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय आणि मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या TULIP (The Urban Learning Internship Program) या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ :- सचिव गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय,नवी दिल्ली यांचे दि.३०.०७.२०२० चे पत्र व TULIP इंटर्नशिप कार्यक्रमाचे माहितीपत्रक.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये केंद्र शासनाचे गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय आणि मानव संसाधन विकास मंत्रालय यांनी संयुक्तपणे देशातील नविन पदवीधरांना शिक्षणोत्तर आवश्यक कौशल्य मिळवण्यासाठी व देशातील नागरी स्वराज्य संस्थानां व स्मार्ट सिटी यांना विविध क्षेत्रातील हुशार, उत्साहि, तरूण मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी TULIP (The Urban Learning Internship Program) च्या स्वरूपात इंटर्नशिपचे नवीन व्यासपीठ (https://internship.aicte-india.org/module_ulb/Dashboard/TulipMain/index.php) उपलब्ध करुन दिले आहे.याबाबतच्या केंद्रशासनाच्या सूचनांचा संपूर्ण संच सोबत जोडला आहे.

२. सदर TULIP इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत तरुण नविन पदवीधरांसाठी आठ आठवडे ते एक वर्ष एवढ्या कालावधीसाठी नागरी स्वराज्य संस्थेमधील विविध प्रकल्पांवर काम करण्याची संधी देऊन त्याद्वारे त्या आवश्यक कौशल्याधारीत मनुष्यबळात रुपांतर करणे असा नागरी स्वराज्य संस्था व नविन तरूण पदवीधर असा दोघांच्याही फायद्याचा हा इंटर्नशिप कार्यक्रमाची अंलबजावणी करण्यासाठी राज्यातील नागरी स्वराज्य संस्थानीं खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) राज्यातील सर्व नागरी स्वराज्यसंस्थानीं TULIP पोर्टलवर आपल्या नागरी स्वराज्य संस्थेची नोंदणी दि.२४.०७.२०२० पर्यंत करावी.

ब) राज्यातील सर्व नागरी स्वराज्यसंस्थानीं आपल्या आवश्यकतेनुसार इंटर्नशिपची माहिती पोर्टलवर प्रदर्शित करावी.

क) सदर पोर्टलवर नोंदणी करणे व इंटर्नशिपची माहिती प्रदर्शित (Present) करण्याची जबाबदारी एका विशिष्ट अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सोपवण्यात यावी.

आपला,

०९/०७/२०२०

(पां.जो.जाधव)

सह सचिव, नगर विकास विभाग

सहपत्र: संदर्भाधिन पत्र व TULIP कार्यक्रमाबाबत केंद्राच्या सुचनांचा संपुर्ण संच.